# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती

## नगर पालिका प्रशासन शाखा

**बायपास रोड, कॅम्प, अमरावती- ४४४ ६०२**

**इमेल : rdmaamravati2@gmail.com,** **वेबसाईट : http://amravatidivision.gov.in**

## शहर समन्वयक (City Co-ordinator) - स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) कंत्राटी तत्त्वावरील

राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) यांचे पत्र क्र. राअस / शहर समन्वयक/७९६/२५-२६ दि.२०/०६/२०२५ मध्ये सुचित केल्यानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीसाठी अमरावती विभागातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता (महानगरपालिका वगळून) स्वच्छ भारत अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक (City-Co-ordinator) ५५ इतक्या पदासाठी ११ महिन्याच्या नेमनुकीकरिता कंत्राटी तत्वावर ऑफलाईन पध्दतीने खालील तक्यात नमूद प्रमाणे पात्रता धारण करणा-या इच्छुक उमेदवाराकडून दि.२१/०७/२०२५ ते २९/०७/२०२५ सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नांव व पदसंख्या | पदे | शैक्षणिक पात्रता | अनुभव निकष (किमान) | वयोमर्यादा व मानधन व कालमर्यादा खालीलप्रमाणे | नेमणुकीचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (City-Co-ordinator) | ५५ | बी.ई. / बी.टेक. (कोणतीही शाखा ) बी.आर्क / बी. प्लॅनिंग बी.एस.सी. (कोणतीही शाखा ) | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान ०६ महिन्याचा अनुभव आवश्यक | **१. वयोमर्यादा:-** कमाल 35 वर्षे (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणा-या उमेदवारास अनुभवा इतकी वयोमर्यादा शिथील करता येईल)<br>**२. मानधन:-** प्रति माह रुपये ४५,०००/-<br>**३. कालमर्यादा:-** ११ महिने | कंत्राटी |

**अटी व शर्ती :**

१. वरील नमूद शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे निकष पुर्ण केलेल्या उमेदवाराकडून केवळ ऑफलाईन पध्दतीने अर्ज **"नगर पालिका प्रशासन विभाग, दुसरा माळा जुनी इमारत, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती"** येथे मागविण्यात येत आहे. सदर पदांची नियुक्ती केवळ कंत्राटी स्वरुपाची ११ महिन्याकरिता असेल, उमेदवारांना कोणत्याही स्वरुपात शासकीय नोकरीचा अथवा इतर लाभांचा दावा करता येणार नाही.

२. सदर पदांची तात्पुरती नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार किंवा नियुक्तीबाबतचा अंतिम निर्णय राज्य शासन व या कार्यालयकडे राखून ठेवण्यात येत आहे.

३. ऑफलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख दि. २९/०७/२०२५ रोजी संध्याकाळी ६.१५ वाजेपर्यंत असेल, त्यानंतर येणारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

४. ई-मेल अथवा online प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

५. अर्जासोबत जोडावयाचे दस्तावेज अर्जदाराने स्वयं साक्षांकित करून जोडावे.

६. प्राप्त अर्जाची छाननी करुन छाननीअंती पात्र उमेदवारांना मुलाखतकरिता उपस्थित राहणे बाबत ईमेलव्दारे कळविण्यात येईल.

७. कंत्राटी शहर समन्वयक यांना वरिल मानधना व्यतिरिक्त कोणतेही शासकीय लाभ प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे मिळणार

नाहीत अथवा त्यांना कसल्याही प्रकारचे वेतन भत्ते अदा केले जाणार नाहीत.

८. कंत्राटी शहर समन्वयक (City-Co-ordinator) यांचे वेतन नगरपरिषद / नगरपंचायती स्तरावर वितरीत केले जाईल.

९. सर्व शहर समन्वयकाची निवड विभागस्तरावर एकत्रितपणे केली जाईल, तदनंतर प्राधान्यक्रम व उपलब्ध जागा, गुणांकणांप्रमाणे नियुक्ती दिली जाईल. तथापि अंतिम निर्णय प्रशासनाचा राहील.

१०. स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत ज्या उमेदवारास स्थानिक स्वराज्य संस्थानी (नागरी) काळ्या यादीत / नियुक्ती रद्द अथवा अपात्र ठरविले आहे, त्या उमेदवारास सदर पदभरती प्रक्रियेतून वगळण्यात येईल याची नोंद घ्यावी.

११. जर अनुभव प्रमाणपत्र खोटे, अपूर्ण, अस्पष्ट किंवा संशयास्पद असल्याचे आढळले आणि तपासणीअंती हे सिध्द होत असेल, तर अदाकर्ता आणि प्राप्तकर्ता दोघांवरही कायदेशीर कार्यवाही केली जाईल आणि उमेदवाराला अपात्र ठरवले जाईल.

१२. अर्ज करण्यासाठी सोबत दिलेल्या लिंक मधील अर्जाचाच नमुना वापरण्यात यावा इतर नमुना ग्राह्य धरण्यात येणार नाही. अर्ज नमुना लिंक - https://lnk.ink/ZyiX0

**स्वा/-**
**(नितीन कापडणीस)**
**सह आयुक्त,**
**नगरपरिषद प्रशासन विभाग,**
**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.**